**कृपया प्रसिध्दीसाठी** **16 मे 2011**

## चर्चगेट - डहाणू थेट रेल्वे त्वरित सुरु न झाल्यास प्रवाशांचा आंदोलनाचा इशारा

**नालासोपारा, सोमवार :** डहाणू - चर्चगेट लोकल गाडी त्वरित सुरु न झाल्यास नव्याने येणा-या रेल्वे मंत्र्यांना उग्र आंदोलनास सामोरे जावे लागेल, असा ईशारा काल नालासोपा-यात भरलेल्या डहाणू - विरार - बोरीवली रेल्वे प्रवासी परिषदेत सामील झालेल्या शेकडो प्रवाशांनी दिला. माजी रेल्वे राज्यमंत्री श्री. राम नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेचे उद्घाटन आमदार ॲड. चिंतामण वनगा यांनी केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आमदार श्री. संजय केळकर, भाजपा प्रदेश उपाध्यक्षा सौ. मनिषा चौधरी, श्री. रोहिदास पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

आमदार ॲड. चिंतामण वनगा यांनी उद्घाटनपर भाषणात रेल्वेच्या ढीसाळ कारभारावर सडकून टीका केली. श्री. चिंतामण वनगा म्हणाले, "श्री.अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारात तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री राम नाईकांनी मनावर घेतले म्हणून डहाणूपर्यंतची लोकल बजेटमध्ये आली. परंतु आता ते काम पूर्ण करण्याची जबाबदारी ज्यांची आहे त्यांनीच दिरंगाई चालवली असेल तर रस्त्यावर यावे लागेल."

माजी रेल्वे राज्यमंत्री श्री.राम नाईक यांनी सर्वप्रथम उत्स्फुर्त जमलेल्या शेकडो प्रवाश्यांच्या मागण्यांचा ठराव परिषदेपुढे मांडला. त्यावेळी बोलताना श्री.नाईक म्हणाले, "अटलजी पंतप्रधान असताना स्थापन झालेल्या मुंबई रेल्वे विकास प्राधिकरणाद्वारे मंजूर झालेले रु. 3,125 कोटींचे प्रकल्प जे 2007 सालीच पूर्ण व्हावयास हवे होते ते आजतागायत पूर्ण न झाल्याबद्दल केंद्र सरकार बरोबरच आपला वाटा न उचलणारे राज्य सरकारही जबाबदार आहे. मुंबई रेल्वे विकास प्राधिकरणाच्या या प्रकल्पांसाठी दिरंगाईमुळे वाढीव रु. 1,049 कोटी लागले.

..2..

परंतु तरीही प्रकल्प अपूर्णच आहेत हे सतांपजनक आहे." लोकसभेत रेल्वे बजेटवर चर्चा होत असताना पश्चिम रेल्वेवरील उपनगरी प्रवाशांचे प्रतिनिधीत्व करणारे खासदार श्री. बळीराम जाधव व खासदार श्री.संजय निरुपम यांनी मुंबईकर रेल्वे प्रवाशांच्या समस्यांबाबत तोंड न उघडल्याबद्दल श्री.नाईक यांनी घणाघती टीका केली.

चर्चगेट - डहाणू थेट लोकल गाडी सुरु करण्यात आता कोणतीही अडचण नाही. काम पूर्ण झाले आहे. गाड्याही आल्या आहेत तरीही पश्चिम रेल्वे प्रशासनाने गाडी सुरु केलेली नाही, याची माहिती श्री.राम नाईक यांनी देताच उपस्थित प्रवाशांनी जोरदार निषेध केला. चर्चगेट - डहाणू थेट लोकल गाडी त्वरीत सुरु व्हावी ही प्रमुख मागणी परिषदेच्या ठरावात मांडण्यात आली. याखेरीज विरार कारशेड व यार्ड 30 जून पर्यंत बांधून पूर्ण करावे, रेल्वे प्रशासनाने 14 एप्रिल 2011 पासून चर्चगेट - वांद्रे, चर्चगेट - अंधेरी, चर्चगेट - बोरीवली 106 नवीन फे-या सुरु केल्या त्याचे स्वागत असले तरी विरार क्षेत्रासाठीही गाड्या वाढवाव्यात, तसेच महिलांसाठी विरारहून सकाळी व चर्चगेटहून सायंकाळी आणखी एक - एक गाडी वाढविणे, नऊ डब्यांच्या गाड्या बारा डब्यांत रुपांतरीत करणे, डहाणू ते पनवेल, डहाणू ते ठाणे लोकल गाड्या सुरु करणे. विरारच्या उड्डाणपूलाचे काम त्वरीत पूर्ण करणे व नायगाव, सफाळे, वाणगावसाठी उड्डाणपूल मंजूर करणे, प्रत्येक स्टेशनवर पुरेशा तिकिट खिडक्या, कुपन यंत्रे, पादचारी पुल, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, उघडे फलाट आच्छादीत करणे, फलाटांची उंची वाढविणे, पुरेशी बाके व पंखे उपलब्ध करणे, रेल्वे स्थानकांत तसेच डब्यांत संचार करणारे भिकारी, फेरीवाले, तृतीयपंथी व पाकीटमार यांना अटकाव करणे. पश्चिम रेल्वे महाव्यवस्थापक व मुंबई रेल्वे विकास प्राधिकरणाच्या व्यवस्थापकीय संचालकांची रिक्त पदे त्वरीत भरणे, आदी मागण्याही श्री.राम नाईक यांनी आपल्या ठरावात मांडल्या.

..3..

यानंतर ठरावाला अनुमोदन देताना कोकण पदवीधर मतदारांचे आमदार श्री.संजय केळकर म्हणाले की झोपलेल्या सरकारला छोट्या आंदोलनाने जाग येत नाही त्यासाठी महाआंदोलनच उभारण्याची परिषदेने तयारी करावी. भाजपा महाराष्ट्र प्रदेशच्या उपाध्यक्षा श्रीमती मनिषा चौधरी यांनी प्रवासी महिला व विद्यार्थ्यांचे प्रश्न परिषदेपुढे मांडले. श्रीमती चौधरी म्हणाल्या, "राजस्थानातील प्रवाशांप्रमाणे आता रस्त्यावर येऊन मोठे आंदोलन केल्याखेरीज हे सरकार जागे होणार नाही."

परिषदेचे संयोजक सर्वश्री भाविक सोरठी, मधुकर पाटील, मिठालाल जैन, रघुनाथ पाटील, अमोल पिंपळे, राजन नाईक, शेखर धुरी, केदारनाथ म्हात्रे, बाबाजी काठोळे या सर्वांसह अध्यक्ष श्री. राम नाईक, आमदार सर्वश्री चिंतामण वनगा, विष्णु सावरा, संजय केळकर व श्रीमती मनिषा चौधरी यांची कृति समिती पुढील कार्यवाहीसाठी तयार करण्याचा निर्णय ठराव संमत करताना परिषदेला उपस्थित प्रवाशांनी घेतला. या कृती समितीने विद्यमान रेल्वे मंत्री कु. ममता बॅनर्जी यांच्या जागी नव्याने जे रेल्वे मंत्री येतील त्यांच्याकडे तसेच रेल्वे बोर्डाच्या अध्यक्षांकडे परिषदेचा ठराव पोचवून त्याच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा करावा, असे परिषदेत ठरले. यावेळी जवळ - जवळ दोनशेहून अधिक प्रवाशांनी आपल्या लेखी सूचना श्री. राम नाईक यांना सादर केल्या, तर नगरसेवक श्री. राजन नाईक यांच्यासह अनेक प्रवाशांनी उत्स्फुर्तपणे व्यासपीठावर येऊन आपल्या समस्या मांडल्या.

परिषदेच्या माध्यमातून आपल्या समस्यांना व्यासपीठ मिळाल्याच्या समाधानात प्रवासी परतताना दिसत होते.

**(कार्यालय सचिव)**